महाराष्ट्र शासन

क्र. मावज-२०२६/२७०/प्र.क्र.९७/मावज-१
माहिती व जनसंपर्क विभाग,
मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दिनांक :-१७ जुलै, २०२६

विषयः- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट -अ आणि गट- ब मध्ये कार्यरत सर्व ९१ अधिकाऱ्यांकरीता आयोजित प्रशिक्षणासाठी एकूण खर्चाच्या ४०% रक्कम ही अगाऊ (ॲडव्हास्) म्हणून प्रशिक्षण संस्थेस अदा करण्याकरीता ₹ १२,७४,०००/- इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास मान्यता देण्याबाबत.

संदर्भः- १. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय पत्र क्र. प्रविस्था -०४ (२०२६)/प्रशिक्षण/का-१/१२९३, दि.२४.०६.२०२६
२. शासन निर्णय सा.प्र.वि.,क्र.मावज-२०२६/२१६/प्र.क्र.६३/मावज-२(३४अ), दिनांक २५ जून, २०२६

<u>शासन आदेश</u>

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील माहिती या संवर्गातील गट -अ आणि गट- ब मध्ये कार्यरत सर्व ९१ अधिकाऱ्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन (IIMC), नवी दिल्ली येथे शासकीय जनसंपर्क या विषयावरील प्रशिक्षणासाठी शासन निर्णय सा.प्र.वि.,क्र.मावज-२०२६/२१६/प्र.क्र.६३/मावज-२(३४अ), दिनांक २५ जून, २०२६ अन्वये रू.३१,८५,०००/- एवढ्या रकमेस प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. सदर प्रशिक्षणापूर्वी एकूण खर्चाच्या ४०% रक्कम ही अगाऊ (ॲडव्हास) म्हणून सदर संस्थेस अदा करावयाची असल्याने, संक्षिप्त देयकावर रु.१२,७४,०००/- (अक्षरी रुपये बारा लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त) इतकी रक्कम काढणेबाबत प्राप्त झालेल्या संदर्भाधीन क्र.१ येथील प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तावित खर्च करतांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येईल.
२. सदर प्रशिक्षणाकरीता येणाऱ्या खर्चाची पडताळणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहील.
३. शासन परिपत्रक क्र. मुंविनि-२०१७/प्र.क्र.३८/२०१७/विनियम, दि.१८.१२.२०१७ मधील सुचनेनुसार "मागणी क्र.ए ६-२२२० माहिती व प्रसिद्धी ०१ चित्रपट ००१ संचालन व प्रशासन (००)(०१) प्रसिध्दी संचालक, सांकेतांक क्र.२२२०००४३ या उपशिर्षाखाली ५० इतर खर्च" या लेखाशिर्षाखालील दि.३१.०५.२०२६ पूर्वीची प्रलंबित तपशिलवार देयके त्वरित निकाली काढण्यात येतील.

४. दि.३१.०५.२०२६ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयकांचा त्वरेने निपटारा करण्यात येईल.

५. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

६. खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

७. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची जबाबदारी संबंधित लेखा अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांची राहील.

८. मासिक निधी विवरणपत्रानुसार याकरिता निधी उपलब्ध आहे.

२. वित्तीय अधिकार- वित्त विभाग, शासन निर्णय दि. १७/०४/२०१५ वित्तीय अधिकार भाग-पहिला उपविभाग-दोन, अ. क्र.११ अ), नियम क्र.३४ नुसार प्रशासनिक विभागास संक्षिप्त देयकांवर रक्कम काढण्यासाठी मंजूरी देण्यास रु.४.०० लक्ष पर्यंतचे अधिकार आहेत. सदर खर्च प्रशासकीय विभागाच्या वित्तीय मर्यादेपेक्षा अधिक असल्याने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.४०८/व्यय-४, दि.०८/०७/२०२७ व अनौपचारीक संदर्भ क्र.२०२/२०२६/विनियम, दि.१५/०७/२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीने सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.ए-६, प्रधानशीर्ष-२२२० माहिती व प्रसिद्धी, ०१ चित्रपट, ००१- संचालन व प्रशासन (००) (०१) प्रसिध्दी संचालक, संगणक सांकेतांक क्र.२२२०००४३ (अनिवार्य), ५० इतर खर्च या लेखाशीर्षामधील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

४. उपरोक्त नमूद केलेल्या अटीप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७१६३३३४५०३८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by SARIKA UTTAM PATIL
Date: 2026.07.17 16:35:48 +05'30'

(सारिका उ.पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

३) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा). मुंबई/नागपूर

४) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

७) कक्ष अधिकारी (का. १४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

८) कक्ष अधिकारी (व्यय-४/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

९) लेखाधिकारी (आहरण व संवितरण) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. (२ प्रती)

१०) लेखाधिकारी (अर्थसंकल्प), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११) निवडनस्ती (मावज-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई